## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ४०/२०१३ मधील निशाणी १६७ वरील आदेश</u>
## <u>सी.एन.आर.क्र.एमएचएसआय-०५-०००२१६२०१३</u>

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ३ब यांना दावा समन्सची बजावणी होवून देखील ते दाव्याच्याकामी हजर न झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत याकामी सामील करुन घेणे करीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ब यांचे म्हणणे असे की, त्या त्याच्या सासरी राहत असल्याने व त्यांना लहान बाळ असल्याने त्या दाव्याच्या कामी नेमल्या तारखेदिवशी न्यायालयात हजर राहू शकलेल्या नाहीत व वकिलांशी संपर्क साधू शकलेल्या नाहीत. सदरचा आदेश रद्दबातल न झाल्यास त्यांच्यावर अन्याय होणार आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत याकामी दाखल करुन घेण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादीने निशाणी १६९ येथे त्याचे म्हणणे देवून अर्जास विरुध्द केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की दावा सन २०१३ मध्ये दाखल केलेला आहे. दावा दाखल करुन ११ वर्षांचा कालावधी झालेला आहे, दावा अंतिम युक्तीवादाकरीता नेमण्यात आलेला असताना प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. ३ब यांचे मार्फत हा अर्ज केवळ दाव्याचे काम लांबणीवर पडण्यासाठी दिलेला आहे, अर्जातील कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. ३अ व इतर प्रतिवादींनी तोंडी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. ३ब यांचा अर्ज त्यास वादीतर्फे विधीज्ञांनी दिलेले म्हणणे तसेच दोन्ही बाजूंचा युक्तीवाद यांचा विचार करून खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. ३ब यांचा सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे का ? | होय. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबतः-</u>**

५. अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जात नमूद कारणे अभिलेख पाहता संयुक्तिक वाटत

नाहीत. अभिलेख पाहता प्रतिवादी क्र. ३ब ह्या दाव्याच्या कामी हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द दि. २७/०३/२०२४ रोजी दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश झालेला आहे. परंतु, याकामी जर सदर प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी न दिलेस त्यांच्या हक्कास ते मुकणार आहेत. ही बाब खरी आहे की, प्रतिवादी क्र. ३ब ह्या दाव्याच्या कामी समन्स बजावणी होवून देखील हजर झालेल्या नाहीत, त्यामुळे दाव्याच्या कामकाजास विलंब झालेला आहे. परंतु तो विलंब वादीला खर्च देवून भरून निघू शकतो. तसेच सदरचा विलंब केवळ तांत्रिक कारणामुळे झालेला आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्त्वाचा विचार केला असता सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, मी या निष्कर्षापर्यंत येत आहे की, सदरचा प्रतिवादी क्र. ३ब यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देऊन मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ब विरुध्द झालेला दि. २७/०३/२०२४ रोजीचा दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश त्यांनी वादी यांना रक्कम रुपये १००/- (रू. शंभर मात्र) चा खर्च देण्याच्या अटीवर रदद्बातल करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR

Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2024.07.22 11:13:10 +0530

दिनांकः- १९/०७/२०२४.

(डी.वाय.रायरीकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वेंगुर्ला.